# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.04.2025** **वारःशनिवार**

---

1. येत्या पाच वर्षात देशाची संरक्षण निर्यात पन्नास हजार कोटींवर पोहोचण्याचा संरक्षण मंत्र्यांचा विश्वास.
2. युनेस्कोच्या मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टरमध्ये श्रीमद् भगवद्गीता आणि भरत मुनींच्या नाट्यशास्त्राचा समावेश.
3. आंतरराष्ट्रीय अंतरिक्ष मोहीमेअंतर्गत दोन भारतीय अंतराळवीरांचा ऍक्झिऑम मोहिमेत सहभाग.
4. इलेक्ट्रॉनिक उत्पादनात गेल्या दशकभरात पाच पटीनं वाढ, मेक इन इंडिया उपक्रमाचा हातभार आणि
5. उत्तर भारतातल्या बहुताश भागात मुसळधार पाऊस तर उत्तर प्रदेश, राजस्थानमध्ये धुळीच्या वादळाची शक्यता

**<u>संरक्षण निर्यात</u>**

येत्या पाच वर्षात म्हणजेच 2030 पर्यंत भारताची संरक्षण निर्यात 50 हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल असा विश्वास संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केला आहे. महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर इथं चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर सीएमआयएनं आयोजित केलेल्या मराठवाडा- आत्मनिर्भर भारत की रक्षा भूमी या विषयावर संवाद सत्रात ते काल बोलत होते. सद्यसरकारच्या काळात संरक्षण निर्यातीत चाळीस पटीनं वृद्धी झाल्याचं सांगून 2014 मध्ये सहाशे कोटी असल्याची निर्यात 24 हजार कोटी रुपयांवर पोचल्याचं सिंह यांनी सांगितलं. यावेळी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. दिल्ली मुंबई औद्योगिक पट्ट्याच्या प्रकल्पाच्या विस्तारासाठी आणखी आठ हजार एकर जमीन संपादित केली जाणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. या संवाद सत्रानंतर संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण झालं.

**<u>युनेस्को-गीता</u>**

युनेस्कोच्या मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टरमध्ये म्हणजेच जागतिक महत्त्वाच्या आणि उत्कृष्ट वैश्विक मूल्ये असलेल्या वारसा नोंदींमध्ये आता श्रीमद् भगवद्गीता आणि भरत मुनींच्या नाट्यशास्त्राचा समावेश करण्यात आला आहे. यांतील दोन हजार वर्षांपूर्वी रचलेल्या भरतमुनींच्या नाट्यशास्त्र या ग्रंथाचं एक हस्तलिखित तसंच भगवद्गीतेची काश्मीरी शारदा लिपीतील पाच हस्तलिखितं पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरातील आहेत. दरम्यान, भारताची कालातीत विद्वत्ता आणि समृद्ध संस्कृती यांना मिळालेली ही जागतिक मान्यता आहे अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. या दोन्ही ग्रंथांनी शतकानुशतकं संस्कृती आणि

सद्सद् विवेकबुद्धी जोपासण्याचं काम केलं असून, यापुढेही ते जगाला प्रेरणा देत राहतील असं मोदींनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>अंतराळ मोहीम</u>**

भारत आता अंतराळ क्षेत्रातल्या आपल्या ऐतिहासिक यशाची पुनरावृत्ती करण्यास सज्ज आहे. आंतरराष्ट्रीय अंतरिक्ष मोहीमेअंतर्गत भारतीय अंतराळवीर पुढच्या महिन्यात आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणार आहे. भारतीय वायु दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आगामी ऍक्झिऑम अंतराळ मोहीमेत सहभागी होतील अशी माहिती अंतराळ आणि अणु उर्जा राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंग यांनी काल दिली. या मोहीमेद्वारे भारतीय अंतराळ क्षेत्रात एक नवा अध्याय लिहीला जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. इस्रोच्या आगामी योजनांच्या उच्च स्तरीय आढावा बैठकीनंतर ते नवी दिल्लीत बोलत होते.

**<u>चापेकर स्मारक-मुख्यमंत्री</u>**

चापेकर बंधूंचं स्वातंत्र्य लढ्यातलं योगदान अमूल्य आहे. त्यांचं स्मारक खऱ्या अर्थानं युवकांना देशभक्तीचे संस्कार देणारं ठरेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. चिंचवड इथल्या क्रांतीवीर चापेकर स्मारकाचं लोकार्पण आणि राष्ट्रीय संग्रहालयाच्या कामाचा प्रारंभ काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. भारताचा सुवर्णमय इतिहास या स्मारकातून पाहायला मिळेल असं फडणवीस यावेळी म्हणाले.

**<u>जेईई निकाल</u>**

अभियांत्रिकीसाठी घेण्यात आलेल्या संयुक्त प्रवेश परीक्षा म्हणजेच जेईईच्या दुसऱ्या मुख्य सत्राचा निकाल आज जाहीर होणार आहे. हा निकाल जेईईचे संकेतस्थळ jeemain.nta.nic.in वर पात्रता गुणांसह जाहीर होणार असल्याचं राष्ट्रीय चाचणी संस्थेनं निवेदनाद्वारे कळवले आहे. ही परीक्षा दोन फेऱ्यांमध्ये होते, दोन्ही सत्रांमध्ये परीक्षा दिल्यास, अंतिम गुणयादी करताना जेईई मुख्य परीक्षेतील सर्वोत्तम गुणांचा विचार केला जाईल.

**<u>इलेक्ट्रॉनिक</u>**

इलेक्ट्रॉनिक उत्पादनात गेल्या दहा वर्षात पाच पट वाढ झाल्याचं इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. ते काल हरियाणाच्या गुरुग्राममधल्या मनेसर इथं पत्रकारांशी बोलत होते. मेक इन इंडिया उपक्रमामुळे इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्रात मोठी वाढ झाली असून गेल्या दहा वर्षांत इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीतही सहा पट वाढ झाली आहे, असंही मंत्र्यांनी सांगितलं. सरकारनं अलीकडेच इलेक्ट्रॉनिक घटक उत्पादन योजनेला मंजुरी दिली आहे, ज्यामुळं इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन परिसंस्था आणखी सक्षम होईल रोजगारसंधीमध्ये वाढ होईल असंही अश्विनी वैष्णव म्हणाले.

**<u>जीएसटी युपीआय</u>**

दोन हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या युपीआय व्यवहारांवर वस्तू आणि सेवा कर आकारण्याचा सरकारचा कोणताही विचार नसल्याचं अर्थमंत्रालयानं काल स्पष्ट केलं. याविषयी केले जाणारे दावे निखालस

खोटे, दिशाभूल करणारे आणि विनाआधार असल्याचं आणि सरकारकडून असा कोणत्याही प्रस्ताव विचाराधीन असल्याचं मंत्रालयानं एका निवेदनाद्वारे स्पष्ट केलं आहे.  याउलट सरकार युपीआयद्वारे डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यासाठी वचनबद्ध असल्याचंही निवेदनात म्हटलं आहे.

**<u>कच्चेतेल</u>**

गुड फ्रायडे निमित्त जागतिक कच्च्या तेलाचे बाजार व्यवहारासाठी काल बंद होते. इराणच्या तेल निर्यातीला आळा घालण्यासाठी अमेरिका आणि युरोपियन युनियन यांच्यातील व्यापार करार आणि अमेरिकेचे नवे निर्बंध यामुळं गुरुवारी तेलाच्या किमती तीन टक्क्यांहून अधिक वाढल्या.

**<u>केंद्र-रडार</u>**

रस्ते सुरक्षा आणि वाहातूक अंमलबजावणीमध्ये निष्पक्षता बळकट करण्यासाठी केंद्रानं रडार उपकरणांसाठी नियम अधिसूचित केले आहेत. वाहनांचा वेग मोजण्यासाठी रडार उपकरणांचा वापर केला जातो. हे नियम 1 जुलैपासून लागू होतील असं ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

**<u>महिला आयोग-कोलकाता</u>**

पश्चिम बंगालमधल्या मुर्शिदाबाद इथं वक्फ दुरूस्ती कायद्याविरोधात झालेल्या निदर्शनानंतर झालेल्या हिंसाचाऱ्याच्या चौकशीसाठी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर काल कोलकाता इथं पोहोचल्या. आयोगाच्या चौकशी समितीच्या सदस्या असलेल्या रहाटकर मालदा आणि मुर्शिदाबाद इथं प्रभावित क्षेत्राला भेट देतील. जातीय अशांततेमुळे प्रभावित झालेल्या महिलांचे मनोबल वाढवणे, पीडीतांशी संवाद साधून, त्यांचे अनुभव नोंदवून त्याच्या संरक्षण आणि पुनर्वसनासाठी आवश्यक उपाययोजनांची शिफारस अधिकाऱ्यांना करण्याची योजना असल्याचं त्यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

**<u>बांग्लादेश-टिप्पणी</u>**

दरम्यान, पश्चिम बंगालमधल्या घडामोडींविषयी बांग्लादेशच्या अधिकाऱ्यांनी केलेली वक्तव्ये भारताने फेटाळून लावली आहेत. बांग्लादेशात अल्पसंख्याकांवर सुरू असलेल्या अत्याचारांवर भारताने व्यक्त केलेल्या चिंतेशी जोडण्याचा छुपा आणि कपटी प्रयत्न असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जायस्वाल यांनी म्हटलं आहे.

**<u>पंतप्रधान-पुस्तक</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध प्रसंग दिलेल्या भाषणांचा संग्रह असलेल्या संस्कृती का पांचवा अध्याय या पुस्तकाचे प्रकाशन काल नवी दिल्ली जुन्या आखाड्याचे प्रमुख आचार्य महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंद गिरी यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आलं. या संबोधनांतून देशाची संस्कृती, परंपरा, आध्यात्मिक मूल्ये आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी मोदींनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्यसभेचे उपसभापती हरिवंश यांनी केले. तर 2014 पासून देशभरात प्रत्येक दिशेने नवोपक्रम दिसून आला आहे आणि वातावरणात परिवर्तन दिसून असल्याची टिप्पणी अवधेशानंद गिरी यांनी याप्रसंगी केली.

**वेव्हज**

जागतिक दृकश्राव्य आणि मनोरंजन परिषद अर्थात वेव्हज अंतर्गत एक अभिनव उपक्रम म्हणून सुरू करण्यात आलेल्या क्रिएट इन इंडिया चॅलेंज पहिल्या मोसमातल्या अंतिम फेरीचा सोहळा येत्या एक ते चार मे दरम्यान मुंबईत होणार आहे. जवळपास एक लाख जणांनी या स्पर्धेत नावनोंदणी केली आहे, त्यामध्ये 60 हून अधिक देशांमधून आलेल्या अकराशेहून अधिक आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रवेशिकांचा सहभाग आहे. विविध क्षेत्रातील कौशल्य प्रतिभेचं या स्पर्धेमधून प्रदर्शित करण्यात येणार आहे.

**माओवादी**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात 9 महिलांसह बावीस नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. या नक्षलवाद्यांवर सुमारे 40 लाख 50 हजार रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं. राज्य सरकारच्या पुनर्वसन धोरणांअंतर्गत या नक्षलवाद्यांना प्रत्येकी पन्नास हजार रुपयांची प्रोत्साहन रक्कम देण्यात आली असून इतर सुविधाही देण्यात येणार आहेत.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये, पंजाब किंग्जनं काल रात्री बंगळुरू इथं पावसामुळं व्यत्यय आलेल्या 14 षटकांच्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा 5 गडी राखून पराभव केला. विजयासाठी 96 धावांचं लक्ष्य पंजाब किंग्जनं 11 चेंडू राखून पूर्ण केलं.

**हवामान**

राजधानी दिल्लीत काल विजेच्या कडकडाटासह झालेल्या पावसानं दिलासा मिळाल्यानं वातावरण आल्हाददायक झालं होतं. आजही यात बदल संभवत नाही. हैदराबादच्या अनेक भागात वादळी वारे आणि मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे तापमानात घट झाली. पुढील दोन दिवसांत वादळ अधिक तीव्र होण्याची शक्यता असून राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये वीज कोसळणे आणि वादळी वाऱ्यांचा इशारा देण्यात आला आहे. हवामान खात्यानं वर्तवलेल्या अंदाजानुसार जम्मू-काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश, पश्चिम बंगाल, सिक्कीम, आसाम आणि मेघालयातही आज काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल. तसंच राजस्थानमध्ये उष्णतेच्या लाटेची शक्यता वर्तवली आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात हवामान उष्ण आणि दमट राहील तर उत्तर प्रदेश आणि राजस्थानात धुळीचे वादळ येण्याची शक्यता आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार**